**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. निवृत्ती विष्णू साळुंखे
जिल्हा परिषद कॉलनी, आगाशिवनगर,
कराड, जि. सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप विभागीय कृषि अधिकारी,
कराड, ता.कराड, जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** तालुका कृषि अधिकारी,
पाटण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६५३ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. निवृत्ती विष्णू साळूंखे
जिल्हा परिषद कॉलनी, आगाशिवनगर, कराड, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप विभागीय कृषि अधिकारी,
कराड, ता.कराड, जि. सातारा श्री.बी.जी.पलघडमल

**जन माहिती अधिकारी तथा** तालुका कृषि अधिकारी,
पाटण, जि. सातारा श्री.यु.के.देसाई

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.११.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.९.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.८.१०.२००८ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**

पश्चिम घाट विकास, काळगाव मध्ये भातखाचर योजनेचे दिनांक ३१.३.२००५ नंतर किती प्लॅनिंग (मंजूर) शिल्लक होते. सदर नियोजित कामाकरिता सर्वेक्षण केलेल्या कामाचा कालावधी, क्षेत्राची निवड करण्यासाठीचे निकष, सर्वेक्षणानंतर नकाशा तयार करुन त्यास मंजुरी घेणे, भातखाचर योजनेचे काम किती क्षेत्रावर झाले, त्यास किती अनुदान खर्च झाले? सदर योजना ज्या गावी राबविण्यात आली त्यांची नावे, गट नं., काम सुरु व पूर्ण करण्याचा दिनांक, मजूर संख्या इ. च्या अनुषंगाने एकूण २० मुद्दयांची माहिती.

## विवेचन

अपीलकर्ता श्री.निवृत्ती विष्णू साळुंखे यांनी पश्चिम घाट विकास, काळगावमधील भातखाचर योजनेच्या संदर्भातील वीस मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, पाटण, जि.सातारा यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी खोटी माहिती दिली व अपिलीय प्राधिकारी तथा उप विभागीय कृषी अधिकारी, कराड यांनी त्यांना पाठीशी घातले. संबंधित अधिकारी खोटी कागदपत्रे तयार करुन शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न करीत आहेत, अशा कारणावरुन श्री.साळुंखे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

हीच माहिती मागण्यासाठी आपण जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे अर्ज केला होता. त्यांनी तो तालुका कृषी अधिकारी, पाटण यांच्याकडे पाठविला. त्या संदर्भात माहिती मिळाली नाही व अपील दाखल करण्याचे राहून गेले, म्हणून आपण पुन्हा दि.११.६.२००७ रोजी केलेल्या अर्जावर दि.९.७.२००७ रोजी आपल्याला शुल्क कळविण्यात आले. परंतु शुल्काचा व ते कोठे भरावे याचा तपशील त्यात कळविलेला नव्हता. तो मागितल्यानंतर, मिळाल्यावर आपण शुल्क भरले. तेव्हा माहिती तयार नव्हती. चार दिवसांनी वीसपैकी नऊ मुद्दयांची माहिती देण्यात आली व इतर मुद्दयांची माहिती उपलब्ध नाही, असे कळविले. कामावरील मजुरांच्या दोन वेगवेगळ्या याद्या दिल्या. एकाच कामावरील एकाच कालावधीतील मजुरांच्या या याद्यांमध्ये तफावत आहे. जाणूनबुजून खरी माहिती लपवून खोटी माहिती दिली जात आहे, असे आपण तालुका कृषी अधिकारी, पाटण श्री.यु.के.देसाई यांना व त्यांच्या वरिष्ठांनाही कळविले. परंतु त्याची दखल घेतली गेली नाही व अद्यापही आपल्याला पूर्ण माहिती मिळाली नाही, असे प्रतिपादन श्री.साळुंखे यांनी केले.

श्री.साळुंखे कृषी खात्यातून कृषी सहाय्यक या पदावरुन सन २००२ मध्ये निवृत्त झाले. कामामध्ये होणारा मोठ्या प्रमाणावरील भ्रष्टाचार आपण याद्वारे बाहेर काढत आहोत, असे त्यांचे म्हणणेआहे. आपल्याला अभिलेख तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आले, परंतु अनेक नोंदी अभिलेखात आढळल्या नाहीत. तसेच जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रमाणित करुन दिलेल्या मजुरांच्या हजेरीच्या छायांकित प्रती दिशाभूल करण्यासाठी दिल्या असून हजेरीपत्रकाच्या पहिल्या व शेवटच्या पानाची छायांकित प्रत एकाच पानावर काढून आतील मजुरांची नावे व त्यांच्या नावे अदा केल्याचे दाखविलेल्या रकमेची छायांकित प्रत देण्याचे टाळले आहे, असे आक्षेपही श्री.साळुंखे यांनी नोंदविले.

श्री.साळुंखे यांचा दि.११.६.२००७ चा अर्ज दि.२१.६.२००७ रोजी कार्यालयाला प्राप्त झाला. विहित मुदतीत त्यांना शुल्क कळविले, परंतु तपशील कळवावयाचा राहिला होता. दि.२३.७.२००७ रोजी तपशिलाची विचारणा करणारा श्री.साळुंखे यांचा अर्ज प्राप्त झाला. तो दि.४.८.२००७ च्या पत्रान्वये त्यांना कळविण्यात आला. दि.२३.८.२००७ रोजी त्यांनी शुल्काची रक्कम भरल्यानंतर दि.३.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांना माहिती देण्यात आली. त्यांनी मागितलेली माहिती विस्तृत होती, त्यामुळे ती त्वरित देता आली नाही. माहितीची सत्यता पडताळण्यासाठी मूळ कागदपत्रे तपासण्याची मागणी त्यांनी केली, त्यानुसार त्यांच्या सोयीच्या दिवशी व वेळेनुसार कागदपत्रांची तपासणी त्यांना करु देण्यात आली. त्यानंतर मुद्दा क्र.७ ची माहिती विशिष्ट तक्त्यामध्ये व मुद्दा क्र.११ ऐवजी नव्या माहितीची मागणी त्यांनी केली. त्याबाबतचे शुल्क दि.१५.१०.२००७ रोजी त्यांनी भरल्यानंतर दि.२०.१०.२००७ रोजी त्यांना माहिती देण्यात आली. राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी केलेल्या अपिलात मुद्दा क्र.१३ व १४ नव्याने उपस्थित केलेला असून यापूर्वी कोणत्याही अर्जात त्यांनी या माहितीची मागणी केलेली नव्हती. मजुरांच्या नावांची व त्यांना अदा केलेल्या पगाराची माहिती त्यांनी मागितलेली नव्हती, त्यामुळे त्यांना ती देण्यात आलेली नव्हती, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, पाटण श्री.यु.के.देसाई यांनी केले. श्री.साळुंखे यांना सर्व कागदपत्रांचे अवलोकन करु देण्यात आले. त्यांच्या मागणीनुसार प्रती देण्यात आल्या. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५

अंतर्गत न येणाऱ्या स्वरुपाची (उदा:-झालेल्या कामाबाबत तांत्रिकदृष्ट्या काम बरोबर असल्याचे आपले मत काय?) माहिती मागता येत नाही व ती कार्यालयात उपलब्ध नाही. त्यामुळे देणे शक्य नाही, हेही त्यांना स्पष्ट करुन सांगण्यात आले, असे अपिलीय प्राधिकारी तथा उप विभागीय कृषि अधिकारी, कराड श्री.बी.जी.पलघडमल यांनी नमूद केले. जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती मूळ कागदपत्रानुसार आहे. ती दिशाभूल करणारी नाही याची खात्री आपण केलेली आहे, असे श्री.पलघडमल यांनी नमूद केले. श्री.साळुंखे यांची फसवणूक करण्यात आलेली नसून ६९७ पेक्षा अधिक पानांची माहिती त्यांना एकत्र करुन देण्यात आली आहे. 'कामांची तपासणी करुन अहवाल सादर करावा,' अशा स्वरुपांच्या त्यांच्या मागण्या प्रशासकीय कार्यवाहीच्या व अन्य आक्षेप तक्रारीच्या स्वरुपाचे आहेत. माहितीच्या अधिकारात त्याचा समावेश होत नसून त्याबाबत तक्रार असल्यास ती ते वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे करु शकतात, असे निवेदन श्री.पलघडमल यांनी केले.

कामावर नसलेल्या मजुरांची नावे नोंदलेली आहेत. त्याबाबत गावकऱ्यांची तक्रार आहे. सन २००५ ते २००७ अखेर कोणत्या परप्रांतीय मजुरांनी काम केले, त्याची नोंद कार्यालयात नाही, असे मुद्दे श्री.साळुंखे यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहेत. 'खोटी कागदपत्रे, तांत्रिक गोष्टी विचार न करता तयार करुन शासकीय अनुदानाचा गैरवापर करुन त्यायोगे जनतेची दिशाभूल करणे हा फौजदारी गुन्हा ठरतो. त्याकरिता शासकीय कर्मचाऱ्यांची विश्वासार्हता सिध्द करणे गरजेचे आहे, त्या दृष्टीने काय उपाय केलात', 'झालेल्या कामांबाबत आपले तांत्रिकदृष्ट्या काम बरोबर असल्याबाबतचे मत काय?', 'कामाची सध्याची स्थिती काय आहे? हे जाणून घेण्यासाठी झालेल्या कामापैकी एक किंवा दोन गटांची तांत्रिकदृष्या तपासणी करुन आपल्या अहवालाची प्रत द्यावी. तारीख माहितीच्या अधिकाराखाली या अर्जाच्या कालबध्दतेचा विचार करुन ठरवावी व मला कळवावी, त्यावेळी मी ठरलेल्या तारखेस, ठरलेल्या ठिकाणी निश्चित केलेल्या वेळी मला तपासणी कामी हजर राहता येईल,' अशा स्वरुपाच्या मागण्या श्री.साळुंखे यांनी भाष्य व आरोपासह

केल्या आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्यांचा समावेश होत नाही.

एकाच कामावरील, एकाच कालावधीतील मजुरांच्या दोन याद्या दिल्या गेल्या व त्यात नावापासून सर्व तपशिलात तफावत आहे, याची छाननी करणे आवश्यक आहे, यासाठी उभय बाजूंनी कागदपत्रांची पडताळणी त्याच ठिकाणी करण्याचे निर्देश आयोगाने दिले. त्यानुसार तफावत असणाऱ्या दोन याद्या श्री.साळुंखे यांनी सादर केल्या व मूळ कागदपत्रांनुसार तफावत असल्याचा आक्षेप नमूद केला. मात्र आपण दिलेल्या माहितीच्या प्रत्येक प्रतीवर 'सत्यप्रत' असा शिक्का असून स्वाक्षरी असल्याचे, व श्री.साळुंखे सादर करीत असलेल्या तफावत दर्शविणाऱ्या दुसऱ्या यादीवर अशा प्रकारचा सही-शिक्का नसल्याचे श्री.देसाई यांनी निदर्शनास आणले.

आपल्या निवेदनाच्या पुष्ट्यर्थ श्री.साळुंखे यांनी दि.२२.२.२००९ रोजी पूरक कागदपत्रांसह निवेदन आयोगाला सादर केले. तालुका कृषी अधिकारी श्री.देसाई यांनी माहिती म्हणून आपल्याला दिलेला मजूर अहवाल व त्याच कालावधीसाठी जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सातारा या वरिष्ठ कार्यालयाला दिलेला मजूर अहवाल यातील मजुरांच्या संख्येपासून गावांच्या नावांपर्यंत अनेक तपशिलात फरक आहे, असे जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सातारा या कार्यालयातून दि.१८.९.२००९ रोजीच्या अर्जान्वये दि.२२.९.२००९ रोजी प्राप्त झालेल्या अहवालावरुन दिसून येते, असे श्री.साळुंखे यांनी निवेदनात नमूद केले आहे. माहितीच्या अधिकारात श्री.साळुंखे यांनी जन माहिती अधिकारी तथा कृषी उपसंचालक, जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सातारा यांच्याकडून या अहवालाची प्रत प्राप्त करुन घेतली असून निवेदनासोबत ती जोडली आहे. त्यानुसार श्री.देसाई यांनी माहितीच्या अधिकारात श्री.साळुंखे यांना दिलेला अहवाल व वरिष्ठ कार्यालयाला श्री.देसाई यांनी सादर केलेल्या अहवालाची जन माहिती अधिकारी तथा कृषी उपसंचालक यांनी दिलेली प्रत यात दि.१.४.२००५ ते १५.४.२००५ अखेर या अहवालातील क्र.१० ते ५४ मध्ये गावांची नावे व मजुरांची संख्या यात तफावत आहे. दि.१६.५.२००५ ते दि.३१.५.२००५ अखेरच्या अहवालात एकूण मजूर संख्या सारखी असली तरी गावानुसार दिलेल्या विभागामध्ये दोन्ही अहवालात वेगवेगळी आकडेवारी आहे. दि.१.५.२००५ ते दि.१६.५.२००५

अखेरच्या अहवालात सर्वच मजुरांच्या एकूण संख्येव्यतिरिक्त कोणत्याच बाबी जुळणाऱ्या नाहीत. तसेच दि.१.५.२००५ ते दि.१५.५.२००५ या काळासाठीच्या श्री.देसाई यांनी वरिष्ठ कार्यालयाला पाठविलेला मजूर अहवाल हस्तलिखित स्वरुपाचा आहे व श्री.देसाई यांनी माहितीच्या अधिकारात श्री.साळुंखे यांना दिलेली याच अहवालाची सत्यप्रत टंकलिखित स्वरुपाची आहे, असे आक्षेप श्री.साळुंखे यांनी नोंदविले. ते लक्षात घेता अहवालाबाबतच्या वस्तुस्थितीची वरिष्ठ पातळीवर तपासणी होणे आवश्यक ठरते.

याच विषयात, याच मुद्दयांबाबत श्री.साळुंखे यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने दि.२.७.२००९ राजी त्यांचा निकाल दिला. सचिव, कृषी विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी या अहवालांबाबत तपासणी करुन कायद्यानुसार योग्य ती कार्यवाही त्वरेने करावी, असा आदेश मुख्य न्यायमूर्ती स्वतंत्रकुमार व न्या.सत्यरंजन धर्माधिकारी यांच्या पीठाने दिला आहे. याचा उल्लेख श्री.साळुंखे यांनी केला नाही. वस्तुत: उच्च न्यायालयात याचिका केलेली व उच्च न्यायालयाने आदेश दिलेले असताना श्री.साळुंखे यांनी सुनावणीच्य पूर्वीच ते निदर्शनास आणणे आवश्यक होते. तसे न करता राज्य माहिती आयोगाकडे स्वतंत्रपणे मागणी व पाठपुरावा करण्याची त्यांची कृती योग्य नाही. अपीलकर्ता श्री.साळुंखे यांना त्याबाबत सक्त समज देण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनीही त्याच वेळी ही बाब ज्ञात असल्यास आयोगाच्या निदर्शनास आणावयास हवी होती.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आयोग

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.७.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४०० ००१

श्री. प्रभाकर धोंडिबा कवडे
सर्व्हे क्र.२८३, शिर्केनगर, मुंढवा, पुणे-३६ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार
पुणे शहर तहसील कार्यालय, पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार
पुणे शहर तहसील कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६५८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.११.२००८ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता -** श्री.प्रभाकर धोंडिबा कवडे<br>सर्व्हे क्र.२८३, शिर्केनगर, मुंढवा,<br>पुणे ४११ ०३६<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार<br>पुणे शहर तहसील कार्यालय, पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार<br>पुणे शहर तहसील कार्यालय, पुणे | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.११.०९.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२८.०९.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२२.११.२००६ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.- |
| ७ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br>घोरपडी पुणे येथील सर्व्हे नं.७६ -अ ७/१२ च्या हक्क नोंदणीबाबत | |

**<u>विवेचन</u>**

घोरपडी, पुणे येथील जागेबाबत मोजणी नकाशाप्रमाणे ७/१२ सदरी हक्क नोंदी करण्याच्या संदर्भात वारंवार मागणी करुनही मोजणी केली जात नाही. अधिकारी निर्णय घेत नाही व कागदपत्रे हरविली जातात, अशी तक्रार अपीलकर्ता यांनी केली.

श्री.कवडे यांच्या अर्जानुसार माहिती देण्यात आली नाही. मात्र त्यांना माहितीपेक्षा प्रशासकीय कार्यवाही हवी आहे. मोजणी नकाशामध्ये ते सह हिस्सेदार असून संबंधित जमीन कॅन्टोन्मेंट हद्दीत असल्यामुळे नगरभूमापन कार्यालय कार्यवाही करु शकणार नाही, असे तहसीलदार यांनी त्यांना कळविलेले आहे. तहसीलदारांनी दि.०८.१२.२००८ ही तारीख निर्णयासाठी दिली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पुणे शहर तहसील कार्यालय, पुणे श्रीमती आशा शंकर होळकर यांनी नमूद केले आहे.

जमिनीवरील हक्क नोंदणीची मागणी हा प्रशासकीय स्वरुपाचा भाग असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मात्र तहसीलदारांनी दि.०८.१२.२००८ रोजी निर्णय देऊन अहवाल आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. मोजणी नकाशाप्रमाणे आपल्या नावे ७/१२ वेगळा करुन मिळण्याची श्री.कवडे यांची मागणी होती. परंतु मोजणी नकाशामध्ये एकूण ४ हिस्से दर्शविले आहेत. त्यात कोणाच्या नावे किती क्षेत्र आहे, हे मोजणीत दर्शविलेले नाही. त्यामुळे नगर भूमापन अधिकारी कार्यालयाकडून फाळणी बारावर मोजणीच्या नोंदणी करुन त्याची प्रत सादर करण्यास श्री.कवडे यांना कळविले होते. त्यांनी त्याची पूर्तता केली नाही. म्हणून आपल्या कार्यालयाने नगर भूमापन अधिकारी क्र.२ यांच्याकडे मोजणीची कागदपत्रे व फाळणी बाराची प्रत मिळण्याची मागणी दि.०८.१२.२००८ व दि.२७.०१.२००९ अन्वये केली. संबंधित कागदपत्रे अभिलेखात नसल्याचे त्यांनी दि.३१.०१.२००९ रोजी कळविले. त्यामुळे श्री.कवडे यांच्या मागणीप्रमाणे ७/१२ वेगळा करुन देता येत नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पुणे शहर तहसील कार्यालय, पुणे श्री.विक्रात चव्हाण यांनी दि.१२.०३.२००९ च्या अहवालान्वये आयोगास अवगत केले व त्याची प्रत श्री.कवडे यांना पाठविली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रामणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : १३ -१०-२००९**

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. महमद बाबालाल मुल्ला
३८, लक्ष्मीनगर, एम.आय.डी.सी.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
कराड विभाग, कराड, जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक,
तळबीड पोलीस ठाणे, तळबीड, ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६६ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. महमद बाबालाल मुल्ला
३८, लक्ष्मीनगर, एम.आय.डी.सी.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
कराड विभाग, कराड, जि. सातारा डॉ. डी.पी. प्रधान

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक,
तळबीड पोलीस ठाणे, तळबीड, ता.कराड, जि.सातारा श्री. एस.बी. घाटगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोबत छायांकित प्रत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२२.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आलेला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २२.८.२००८ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

आपल्या साडूची जमीन संपादित केली गेली व तलाठ्याने दुसऱ्याच व्यक्तीला भरपाईचा चेक दिला. या संदर्भात दाखल झालेल्या गुन्हयातील जाबजबाबाच्या प्रती आपण मागितल्या होत्या. परंतु जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व अपूर्ण माहिती दिली. अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, कराड विभाग, कराड यांनी अपिलाची योग्य दखल घेतली नाही. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. महमद बाबालाल मुल्ला यांनी केली.

दोन भावांमधील जमिनीबाबतच्या वादाचा हा विषय आहे. भरपाईची रक्कम दुसऱ्या व्यक्तीने सही करुन घेतली, अशी मूळ तक्रार होती. दोन्ही भावांचे पतसंस्थेत संयुक्त खाते होते. दोघांनी मिळून पैसे घेतल्याची पतसंस्थेत नोंद आहे. तक्रारीवरुन त्याबाबत गुन्हा दाखल होऊन तपास झाला. कराडच्या दिवाणी न्यायालयात आरोपपत्र व त्यासोबत सर्व कागदपत्रे पाठविली गेली. दिवाणी न्यायालयाने हा दावा काढून टाकला आहे, त्यामुळे श्री.मुल्ला माहितीच्या अधिकारात तोच विषय पुन्हा मांडत आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाययक पोलीस निरीक्षक, तळबीड श्री. एस.बी.घाटगे यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

न्यायालयाकडे दाखल असलेली कागदपत्रे अपीलकर्त्यास माहितीच्या अधिकारात न्यायालयाकडे अर्ज करुन घेता आली असती. जन माहिती अधिकारी तथा सहाययक पोलीस निरीक्षक, तळबीड यांनी अपीलकर्त्याला आवश्यक असल्यास न्यायालयाकडून या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास पुरवाव्या. यासाठीचे शुल्क अपीलकर्त्याने भरावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २१.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. विष्णू रामचंद्र उगले, ज्येष्ठ पत्रकार
दिपमळा, मु.पो.दौंड, जि. पुणे-४१३८०१

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा साखर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, साखर संकुल,
शिवाजीनगर, पुणे-४११ ००५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता
(साखर) साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६६१ + ६६२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.६.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. विष्णू रामचंद्र उगले, ज्येष्ठ पत्रकार
दिपमळा, मु.पो.दौंड, जि. पुणे-४१३८०१

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

दौंड सहकारी साखर कारखान्याने आलेगाव येथील यंत्रसामुग्री प्राप्त केलेबाबतची माहिती

**विवेचन**

दौंड सहकारी साखर कारखान्याने घेतलेल्या यंत्रसामग्रीबाबतची माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (साखर), साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे

मागितली होती. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी ही माहिती साखर कारखान्याच्या अखत्यारित असल्याचे नमूद करुन आपला अर्ज त्यांच्याकडे वर्ग केला. वस्तुतः कारखान्याकडून घेऊन ही माहिती ते देऊ शकले असते. परंतु त्यांनी तसे केले नाही व कारखान्याने माहिती दिली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. विष्णू रामचंद्र उगले यांनी केले.

राज्य माहिती आयोगाने दि. १८.६.०८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष निर्गत कार्यक्रम' व दि.२६.११.२००८ रोजी घेतलेली सुनावणी या दोन्ही वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित नव्हते.

श्री. उगले यांच्या अर्जातील १३ मुद्दयांमध्ये काही मुद्दे अभिप्रायाची / खुलाशाची मागणी करणारे आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अशी विचारणा करता येत नाही. मात्र उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी, साखर आयुक्त कार्यालय, शिवाजीनगर, पुणे यांनी प्राप्त करुन घेऊन देणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य.

२. अपीलकर्ता श्री. विष्णू रामचंद्र उगले यांच्या अर्जानुसार देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (साखर), पुणे यांनी दौंड सहकारी साखर कारखान्याकडून प्राप्त करुन घेऊन श्री. उगले यांना द्यावी. याबाबतचा अनुपालन अहवाल दि. २०.१०.२००९ पर्यंत जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर करावा.

३. 'विशेष निर्गत कार्यक्रम' व दि.२६.११.२००८ रोजी घेतलेली सुनावणी या दोन्हीचा अनुपस्थितीबाबतचा खुलासा जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. २०.१०.२००९ पर्यंत आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १५.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. दिपक सोपानराव जगताप
मु.जिरेगाव, पो. कुरकुंभ, ता.दौंड, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६६५ / ८२९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.११.२००८ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| अपील क्र. | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याच्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| ६६५ / पुणे | ३.१.२००७ | २२.१.२००७ | ११.१२.२००७ | १४.३.२००७ |
| ८२९ / पुणे | ६.३.२००७ | २.४.२००७ | -- | -- |

**<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**

**अपील क्र. ६६५/ पुणे**

मार्च २००४ ते एप्रिल २००६ या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शस्त्र परवान्याच्या अनुषंगाने एकूण नऊ मुद्दयांची माहिती

**अपील क्र. / पुणे**

शस्त्र अधिनियम १९५९ मधील तरतूदीनुसार शस्त्र परवाना देण्याबाबत एकूण १७ मुद्दयांची माहिती. ( सोबत छायांकित प्रत जोडली आहे.)

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ११.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश करण्यात आलेला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने त्याच दिवशी अपिलांची सुनावणी घेण्यात आली.

शस्त्र परवान्यासाठी आपण केलेला अर्ज जिल्हाधिकारी, पुणे यांनी नियमानुसार देणे आवश्यक असतानाही नाकारला. त्याबाबतची माहिती आपल्याला दिली जात नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. दिपक सोपानराव जगताप यांनी केले.

आपल्याला शस्त्र परवाना देण्याच्या अर्जावर अन्य विभागांचा अभिप्राय आवश्यक असल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी तीन महिन्याच्या आत पाठविणे आवश्यक होते, पण निर्णय घेण्यास त्यांनी दोन वर्षे लावली. त्यामुळे सन २००४ ते २००६ या कालावधीत आलेल्या अर्जांबाबतची माहितीही आपण मागितली होती. आपल्याला शस्त्र परवाना देऊ नये, असा अहवाल अन्य कोणत्याही विभागाने दिलेला नसताना जिल्हाधिकाऱ्यांनी चुकीची निर्णय प्रक्रिया अवलंबून परवाना नाकारला, असे लेखी व तोंडी प्रतिपादन श्री. जगताप यांनी केले.

श्री. जगताप यांना माहिती देण्यात आली आहे. अर्धन्यायिक निर्णयावर खुलासा व अभिप्राय याची मागणी ते करीत आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत ते शक्य नाही, हे त्यांना स्पष्ट करण्यात आले आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे सौ. मौसमी बर्डे व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे श्री. चिंतामणी जोशी यांनी केले, ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २०.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय दगडू फुगे
स.नं.२२७/१, राधानगरी, भोसरी, पुणे-४११०३९ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, सेक्टर नं२४, निगडी,पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी मुख्य रचनाकार,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, सेक्टर नं२४, निगडी,पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६७३ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दत्तात्रय दगडू फुगे
स.नं.२२७/१, राधानगरी, भोसरी, पुणे-४११०३९

**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी मुख्य रचनाकार,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, सेक्टर नं२४, निगडी,पुणे
श्री.श्री.भि.मानकरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.९.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.१०.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.१२.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>पिंपरी चिंचवड नवनगरप्राधिकरण विकास आराखडा प्रत (डी.पी.प्लान) व त्याबाबतचे शासन राजपत्र क्र.पीपीएस १९७५/७७५/यु.डी.५, दि.८.९.१९७० च्या प्रतीसह | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१२.६.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या दि.८.९.१९७० रोजी मंजूर झालेल्या विकास आराखड्याची प्रत वारंवार मागूनही दिली जात नाही. सन १९७७ मध्ये आराखडा झाल्याचे उत्तर जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी देतात. परंतु १९७० च्या आराखड्यानुसार काम चालू होते. प्राधिकरणाने दि.२०.१०.१९८९ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत दि.८.९.१९७० हीच तारीख मंजूर विकास आराखड्याची म्हणून नमूद केली आहे. म्हणून आपल्याला आराखड्याची प्रत मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.दत्तात्रय दगडू फुगे यांनी केले. प्राधिकरणाची स्थापना दि.१४.३.१९७२ रोजी झाली व प्राधिकरण क्षेत्रासाठी प्रथम विकास आराखडा शासनाने दि.८.९.१९७७ रोजी मंजूर केला. संचालक, नगररचना यांच्याकडूनही सर्व बाबींची शहानिशा करुन याबाबत निश्चिती करण्यात आली आहे व त्यांनी तसे पत्र दिले आहे. श्री.फुगे यांना सर्व संबंधितांच्या पत्रांच्या प्रतींसह वेळोवेळी ही माहिती देण्यात आली आहे, जाहिरातीतील तांत्रिक चुकीचा फायदा घेऊन तोच मुद्दा ते सातत्याने पुन:पुन्हा मांडत आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.श्री.भि.मानकरे यांनी केले.

आराखड्याबाबतच्या नेमक्या तारखेविषयीचे स्पष्टीकरणात्मक पत्र प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आयोगाला सादर करावे व त्याची प्रत अपीलकर्त्यास द्यावी. अपीलकर्त्याने सन १९७० च्या आराखड्याची प्रत उपलब्ध असल्याचे नमूद केले असून त्याने ती सादर केल्यास, चुकीची माहिती दिल्याबद्दल सर्व संबंधित अधिकाऱ्यांना शास्ती केली जाईल, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

दि.२०.१०.१९८९ रोजी प्राधिकरणामार्फत प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या मंजूर विकास आराखड्याची तारीख दि.८.९.१९७७ असणे आवश्यक असताना अनवधानाने व टंकलेखनातील दोषामुळे दि.८.९.१९७० असे नमूद करण्यात आल्याचे दिसून येते. प्राधिकरणाची स्थापना दि.१४.३.१९७२ रोजी झाली असून तत्पूर्वी विकास आराखडा अस्तित्वातच असू शकत नाही, असे स्पष्टीकरण श्री.सुहास दिवसे, मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांनी केले आहे. अपीलकर्त्याने ही माहिती चुकीची असल्याचा आक्षेप दि.१.५.२००९ च्या पत्रान्वये नोंदविला आहे, मात्र सन १९७० मध्ये मंजूर विकास आराखडा असल्याबाबतचा कोणताही अन्य पुरावा सादर केलेला नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२०.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. विद्यासागर राजकिशोर यादव
मु.पो. हुतात्मा कॉलनी, वाळवा, ता.वाळवा, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलगुरु
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा परीक्षा नियंत्रक,
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर — उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६७६/ सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. विद्यासागर राजकिशोर यादव
मु.पो. हुतात्मा कॉलनी, वाळवा, ता.वाळवा, जि.सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा परीक्षा नियंत्रक,
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर श्री. बी.एम.हिर्डेकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.६.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.७.२००८ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोबत छायांकित प्रत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. ११.११.२००८ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

शिवाजी विद्यापीठातर्फे घेतलेल्या बी.बी.ए. परीक्षेच्या फेरतपासणीबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. विद्यासागर राजकिशोर यादव यांनी जन माहिती अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे दोन अर्जाद्वारे मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी काही माहिती दिली व अन्य उमेदवारांचे फेरतपासणीसाठी आलेले अर्ज व त्यावरील शेरे अवलोकन करु देणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ (ज) व (अ) अन्वये नाकारले, म्हणून श्री. विद्यासागर राजकिशोर यादव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे

श्री. यादव यांना त्यांच्या स्वतःच्या उत्तरपत्रिकेची प्रत नियमानुसार देता आली असती. त्याबाबतच्या विद्यापीठ कायद्यातील तरतुदी त्यांना स्पष्ट करण्यात आल्या होत्या. अन्य माहिती त्यांना देण्यात आली. इतर उमेदवारांचे अर्ज व त्यावरील कार्यवाही ही माहिती त्रयस्थ पक्षाची असून त्यात कोणते सार्वजनिक हित सामावले आहे, हे अपीलकर्त्याने सिध्द केलेले नाही. सातत्याने श्री. यादव या प्रकारची माहिती मागत असतात. विद्यापीठातर्फे फेरतपासणीची पध्दत ऑक्टोबर २००५ या सत्रापासून सुरु झालेली असून त्यापूर्वीची माहिती देता येत नाही, तसेच उत्तरपत्रिका सहा महिन्यांपर्यंत जतन केल्या जातात, त्यानंतर नाश केल्या जातात. विद्यापीठाच्या नियमातील त्याबाबतच्या तरतुदींची माहितीही श्री. यादव यांना देण्यात आलेली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२३.१०.२००९